महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

## जाहिरात

अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार
साक्री रोड, आरटीओ ऑफिस जवळ, नंदुरबार-४२५४१२
दुरध्वनी क्रमांक ०२५६४-२१०१३०

वाचा. :- १) मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्र. आस्था-२०१८/सकामा/प्रक्र. /४४८/का-१/४१५ दिनांक २० मार्च २०१८

२) मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्र. आस्था-२०१८/सकामा/प्रक्र. /४४८/का-१/११६ दिनांक १४.०१.२०१९

जाहिरात क्र. आस्था-२०१८/प्र.क्र./का.१(१)/697/२०१९ दिनांक :- 17/01/२०१९

## कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे भरावयाच्या पदाच्या नेमणुकी करीता जाहिरात

अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार या कार्यालयाचे तीन जिल्हाचे (नंदुरबार, धुळे, जळगाव) कार्यक्षेत्र असल्याने प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी या समिती कार्यालयास खालीलप्रमाणे कंत्राटी स्वरुपात कर्मचारी वर्गाची अत्यंत आवश्यकता आहे.

करीता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी पदासमोर दर्शविलेल्या नमुद दिनांकास सकाळी ११:०० वाजता शैक्षणिक पात्रता /अनुभव इ. सांक्षांकित झेरॉक्स व मुळप्रतीसह अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | आवश्यक पद संख्या | एकत्रित मानधन (दरमहा) | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | संशोधन सहाय्यक | ०१ | रु. २५,०००/- | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा. अर्थशास्त्र/ सांख्यिकीशास्त्र/ समाजशास्त्र/ समाजकार्य यातील पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारास प्राध्यान्य देण्यात येईल.<br>२) संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची सक्षमता असणे अनिवार्य आहे.<br>३) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. | २४/०१/२०१९ (दुपारी १२:००) |
| २ | निम्नश्रेणी लघुलेखक | ०३ | रु. २५०००/- | १) उमेदवारा मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा.<br>२) इंग्रजी व मराठी लघुलेखन १०० श. प्र. मि. गतीचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>३) इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. आणि मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. गतीचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>४) संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची सक्षमता असणे अनिवार्य आहे.<br>५) न्यायालयीन/शासकिय कामकाजाचा अनुभव असल्यास प्राध्यान्य देण्यात येईल. | २२/०१/२०१९ (दुपारी १२:००) |
| ३ | विधी अधिकारी | ०३ | रु. ४०,०००/- | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असावा व तो सनदधारक असावा.<br>२) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे व मा. उच्च न्यायालयात दाखल | २३/०१/२०१९ (दुपारी १२:००) |

www.nmk.co.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करावयाचे उत्तर Parawise तयार करता येतील इतपत सक्षमता असावी<br>३) मा. उच्च न्यायालय मुंबई व मा. उच्च न्यायालय औरंगाबाद (खंडपिठ) येथील दाखल प्रकरणात समितीच्या वतीने आवश्यक कामकाज सांभाळण्याची सक्षमता असावी.<br>४) संगणक हाताळण्याची सक्षमता असावी | |
| ४ | विधी सहाय्यक | ०३ | रु. २५,०००/- ते ३०,०००/- | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असावा व तो सनदधारक असावा.<br>२) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे व मा. उच्च न्यायालयात दाखल करावयाचे उत्तर Parawise तयार करता येतील इतपत सक्षमता असावी.<br>३) न्यायालयीन प्रकरणात समिती स्तरावरील व न्यायालयीन स्तरावरील बाबी हाताळण्याची सहक्षमता असावी.<br>४) संगणक हाताळण्याची सक्षमता असावी | २३/०१/२०१९ (दुपारी ०२:००) |
| ५ | कनिष्ठ लिपीक/ लघुटंकलेखक | ०२ | रु. २०,०००/- ते २५,०००/- | १) उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असावा.<br>२) इंग्रजी किंवा मराठी लघुलेखन ६० श. प्र. मि. गतीचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>३) इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. आणि मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. गतीचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>४) संगणकावर इंग्रजी व मराठी भाषेत कामकाज करण्याची सक्षमता असणे अनिवार्य आहे.<br>५) शासकीय कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील. | २५/०१/२०१९ (दुपारी १२:००) |

**अटी व शर्ती :-**

१. वरील सर्व पदांची निवड फक्त नंदुरबार समितीच्या अखत्यारित राहिल व सर्व हक्क नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहिल.
२. सेवानिवृत्त कर्मचारी /अधिकारी यांना देखील प्राधान्य देण्यात येईल.
३. वरील सर्व पदांवरील नेमणूक ही अत्यंत तात्पुरत्या स्वरूपात करार (कंत्राटी) पध्दतीने असल्याने उमेदवारांना शासकिय कर्मचारी/अधिकारी म्हणून कधीही गणले जाणार नाही.
४. उमेदवारांना नियमित शासकिय कर्मचारी म्हणून कुठलाही हक्क असणार नाही.
५. इतर अटी व शर्ती नेमणूक आदेशात नमुद करण्यात येतील.
६. उमेदवारास मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
७. वरील सर्व पदांकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता / अनुभव कमी / जास्त करण्याचे सर्व अधिकारी नियुक्ती प्राधिकाऱ्यास असतील.
८. जाहिराती मध्ये नमुद पदसंख्या कमी / जास्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहील.
९. निवड केलेल्या उमेदवारांना मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे कडुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने (कंत्राटी) नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

**प्रारुप मा. सहआयुक्त यांच्या व्दारे मान्य**

स्वा/-
[दिनेश तिडके]
उपसंचालक,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदुरबार

www.nmk.co.in